
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# महाराष्ट्रातील अनुसूचित जातीची लोकसंख्या

प्रा. डॉ. महेंद्र गजधाने
के.बी.पी. कॉलेज, पंढरपूर.

## प्रास्तावना –



महाराष्ट्राला महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजश्री शाहु महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांचा वारसा लाभल्याने राज्यात अनुसूचित जातीची संख्या लक्षणीय व जागृत असल्याने दिसून येते. महाराष्ट्रात 59 जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केला जातो. यात महार, मांग, चांभार या प्रमुख तीन जातींचे वर्चस्व असल्याने दिसून येते. 2011 च्या जनगणनेनूसार महाराष्ट्रात 100 टक्के अनुसूचित जातीची लोकसंख्या असलेली 34 आणि 50 टक्के लोकसंख्या असलेली 702 खेडी आहेत. तसेच एकूण दलित वस्त्यांची संख्या 37604 इतकी असून अनुसूचित जातीची 3311405 इतकी कुटूंबे आहेत. महाराष्ट्रात अनुसूचित जातीमधील द्रारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे प्रमाण 30.56 टक्के आहे.

## उद्दिष्टे –

1. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे स्वरुप पाहणे.
2. महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येत झालेल्या बदलाचा कल अभ्यासणे.

## अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमधील वाढीचा कल.

1 मे 1960 ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तेव्हापासून राज्यातील एकूण लोकसंख्येबरोबरच अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमध्येही वाढ घडून येत आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्येमधील अनुसूचित जातीचे प्रमाणही वाढत आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून प्रत्येक दशकात अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वाढीच्या दरात बदल घडून आला. हे पुढील कोष्टकामध्ये दर्शविण्यात आले आहे.

**कोष्टक क्र.01**
**महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येमधील वाढीचा कल**

| जनगणना वर्ष | एकुण राज्याची लोकसंख्या | अनुसूचित जाती व नवबौध्दांची लोकसंख्या | टक्के बदल | अनुसूचित जातीचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1961 | 39554 | 2226 | – | 5.33 |
| 1971 | 50412 | 3175 | 42.63 | 6.30 |
| 1981 | 62784 | 4482 | 41.17 | 7.14 |
| 1991 | 78937 | 9393 | 109.57 | 11.09 |
| 2001 | 96879 | 9881 | 5.20 | 10.20 |
| 2011 | 11237 | 1327 | –86.57 | 11.81 |

**स्त्रोत – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी**

कोष्टक 1 वरुन असे दिसून येते की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेवेळी 1961 ला अनुसूचीत जातीच्या लोकसंख्येचे प्रमाण राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 5.33 टक्के इतके होते. यात 2001 च्या जनगणनेचा अपवाद सोडून इतर सर्व जनगणनेत अनुसूचित जातीच्या प्रमाणात वाढ घडून येत असल्याचे दिसते. 2011 च्या जनगणेत अनुसूचित जातीचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 11.81 टक्के झाल्याने दिसते. परंतु 1991 पासून अनुसचित जातीची लोकसंख्या व त्याचे प्रमाण मोठ्याा प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. 1981 ते 1991 च्या दशकात अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वाढीच्या दरात (109.57 टक्के) दुप्पटीने वाढ घडून आली. परंतू 2011 च्या दशकात लोकसंख्या वाढीच्या दरात (86.57 टक्के) घट घडून आली. बाकीच्या सर्व दशकात अनुसूचित जातींच्या लोकसंख्या वाढीच्या दरात घट होत असल्याने दिसून येते.

## महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमधील बदल –

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचा विचार करित असतांना अनुसूचित जातीच्या एकूण लोकसंख्येत, लोकसंख्येच्या प्रमाणात, पुरुष व महिलांची लोकसंख्या, ग्रामीण व शहरी लोकसंख्या, स्त्रि–पुरुष प्रमाण, साक्षरता, यात कशा पध्दतीने बदल होत गेला हे अभ्यासणे महत्त्वाचे असते. याचे स्पष्टीकरण कोष्टका मध्ये दिलेले आहे.

**कोष्टक क.2**

**महाराश्ट्रातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्येमधील बदल**

| घटक | 2001 | 2011 | बदल (मागील दशकातील) |
|---|---|---|---|
| एकुण लोकसंख्या | 9881656 (10.2 टक्के) | 13275898 (11.8 टक्के) | 3394242 (34.3 टक्के) |
| पुरुष | 5063062 (51.24 टक्के) | 6767751 (50.98 टक्के) | 1704897 (33.7 टक्के) |
| महिला | 4818594 (48.76 टक्के) | 6508139 (49.02 टक्के) | 1689545 (35.1 टक्के) |
| ग्रामीण | 6096981 (61.7 टक्के) | 7494819 (43.65 टक्के) | 1397838 (22.93 टक्के) |
| शहरी | 3784675 (38.30 टक्के) | 5781079 (43.55 टक्के) | 1996404 (52.75 टक्के) |
| स्त्रि–पुरुष प्रमाण | 952 | 13275898 (11.8 टक्के) | 10 (1.05टक्के) |
| साक्षरता | 71.9 | 79.2 | 7.3 (10.15 टक्के) |

**स्त्रोत – भारतीय जनगणना – 2011**

कोष्टका वरुन असे दिसून येते की, 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जातीची लोकसंख्या 13275898 (11.8 टक्के) असून 2001 ते 2011 या दशकात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येत 34.3 टक्के नी वाढ घडून आली आहे. या दशकात महिलांच्या लोकसंख्येतील वाढ (35.1टक्के) पुरुषांच्या लोकसंख्याा वाढीपेक्षा (33.7 टक्के) अधिक आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील लोकसंख्येमध्ये 6767759 (59.98 टक्के) पुरुष आणि 6508139 (49. 02 टक्के) महिलांच्या संख्येत 1689545 (35.1 टक्के) नी वाढ घडून आली. महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील पुरुष व महिलांची संख्या व मागील दशकात त्यामध्ये झालेली वाढ जवळजवळ सारखीच असल्याचे दिसून येते.

ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जातीचा विचार केल्यास असे दिसून येते की, राज्यातील एकूण अनुसूचित जातीपैकी ग्रामीण भागात 7494819 (43.65 टक्के) तर शहरी भागात 5781079 (43.55 टक्के) लोक राहतात. ग्रामीण भागात राहणाऱ्यांची संख्या मागील दशकात 22.93 टक्के ने वाढली तर शहरी भागात राहणाऱ्यांची संख्या 52.75 ने वाढली. यावरुन ग्रामीण भागातील लोकसंख्या शहरी भागाकडे स्थलांतरीत होत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील अनुसूचित जातीमधील स्त्रि–पुरुष प्रमाणाचा विचार केल्यास असे दिसून येते की, 2011 ला दर हजारी पुरुषांमागे 962 स्त्रिया असून मागील दशकात स्त्रियांच्या संख्येत 1.05 टक्के ने वाढ घडून आली. महाराष्ट्रातील रत्नागिरी (1094), सिंधुदुर्ग (1072), आणि गोंदिया (1013) या जिल्ह्यात अनुसूचित जातीमधील

स्त्रियांचे दर हजारी प्रमाण प्ररुषांपेक्षा अधिक आहे. ते महाराष्ट्रापेक्षा अधिक दिसून येते. याउलट ठाणे (932), लातूर (940),व मुंबई शहर (942) जिल्ह्यात अनुसूचित जातीमधील स्त्रियांचे प्रमाण सर्वात कमी असल्याने दिसून येते.

राज्यातील अनुसूचित जाती मधील साक्षरतेचे प्रमाण 79.02 टक्के असून गेल्या दशकात अनुसूचित जाती मधील साक्षरतेत 10.15 टक्के नी वाढ घडून आलेली आहे. सध्या ग्रामीण भागातील साक्षरता 71.9 टक्के आहे तर शहरी भागात 87.2 टक्के साक्षरता आढळून येते.

### संदर्भ –

1. भारताचे जनगणना अहवाल
2. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी